**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी १७**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | विठ्ठल दादासो बाड |
| **वय** | :– | ३६ वर्षे, **धंदा** :– शेती |
| **राहणार** | :– | विठलापूर, ता. आटपाडी, जि. सांगली |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती. ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>**

**०१.** दिनांक ०९/०२/२०२१ रोजी मी पंचनाम्यासाठी ढेंबरेवस्ती, विठलापूर येथे गेलो होतो. त्याठिकाणी अपघात झाला होता. माझ्यासोबत दुसरा पंच स्वप्निल राजाराम बाड हे उपस्थित होते. त्याठिकाणी अपघात झाला होता. तेथे एक टिपर होता. त्याठिकाणी विजेच्या तारा खाली रस्त्यावर पडलेल्या दिसल्या. त्याठिकाणी एक मोटारसायकल अपघात अवस्थेत दिसली. टिपर म्हणजे रस्त्याच्या कामासाठी लागणारी वाहतुकीची मोठी गाडी होय. त्यानंतर पाहिलेल्या परिस्थितीचा पंचनामा केला. तो पंचनामा दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१८</u>** देण्यात येते.

**०२.** घटनास्थळी आमच्याबरोबर बरेच लोक होते. त्यांची नावे आता मला सांगता येणार नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एस.व्ही.पाठक विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनाम्याला येण्यासाठी नोटीस, पत्र वगैरे दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी विठलापूर गावचा सरपंच आणि स्वप्निल राजाराम बाड हे विकास सोसायटीचे चेअरमन आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी सरपंच असल्याने माझे कृषी खात्यात येणे–जाणे होते. हे

**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी १७**

म्हणणे खरे आहे की, डंपर आणि टिपर हि दोन वेगवेगळी वाहने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनास्थळी असलेल्या दोन्ही वाहनांचे क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेताच्यावरुन गेलेल्या विजेच्या तारा या कधीकधी विजेच्या उच्च दाबामुळे तुटतात.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी–दिघंची डांबरी रस्ता हा दोन मोठी चारचाकी वाहने एकावेळी जातील एवढा रुंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा डांबरी रस्ता दक्षिण–उत्तर चालीचा असून दक्षिणेकडे आटपाडी आणि उत्तरेकडे दिघंची असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, या रस्त्याच्या तथाकथित घटनास्थळाच्या दोन्ही बाजूला लोकांच्या शेतजमिनी आहेत. असे घडले नाही की, तथाकथित घटनास्थळी मी टेप धरून मोजमाप केली होती. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी पंचनामा लिहिला व त्यावर मी फक्त सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी आणि मयत इसम हे माझ्या संपर्कातील असल्याने, त्यांना मदत होण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.03 12:24:33 +0530

दि. ०३/१२/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी